
International Monthly Research Journal For All Subject

# AKSHARDEEP

Octomber 2014



Editor

**Ganpu Lahane**

# अनुक्रमणिका



| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Community Empowerment through People participation in madern trends | Dr. Prakash Kattimani<br>Mr. Biradar Basavaraj | 01 |
| 2. | Indian Nationalism and Nationalist Muslims | Dr. Syeda Lubna Shireen | 04 |
| 3. | भक्तिकाव्य की दार्शनिक चेतना | डॉ. सुरकुटे शिवकांता | 08 |
| 4. | मैथिलीशरण गुप्त की समसामायिकता | प्रा. लोहकरे किशोर | 11 |
| 5. | हिंदी दलित कहानियों में सामाजिक प्रश्न एवं सामाजिक सरोकार | प्रा. डोंगरे प्रल्हाद<br>प्रा. डॉ. ठाकूर विजयसिंह | 14 |
| 6. | ललिता गादगे की कहानियों में नारी - चित्रण | प्रा. पवार आर. एस. | 19 |
| 7. | ललनमियाँ कहानी एक अध्ययन | डॉ. कुलकर्णी विजयकुमार | 22 |
| 8. | चौंडकं आणि भंडारभोग या कादंबऱ्यातील बोलीभाषा | प्रा. डॉ. ढवळे गौतम | 26 |
| 9. | स्त्रीवाद व स्त्रियांच्या स्वातंत्र्याची स्थिती | डॉ. पोळ हणमंत रामचंद्र | 28 |
| 10. | नांदेड जिल्हा परिषदेतील मुस्लिम नेतृत्त्वाचा राजकीय अभ्यास (२००२ ते २१०२) | प्रा. डॉ. खान इकबाल गफार | 32 |
| 11. | महिला सक्षमीकरण काळाची गरज | प्राचार्य डॉ. गावंडे एम. के. | 35 |
| 12. | बीड जिल्ह्यातील मराठा जातीची दशा आणि दिशा | प्रा. डॉ. जाधव विनोद<br>प्रा. देशमुख पांडुरंग | 38 |
| 13. | भारतीय लिंगभाव असमानता आणि लिंगाधारित विकास निर्देशांक | प्रा. डॉ. टेंगसे एस. ए. | 42 |
| 14. | मराठवाड्याच्या विकासावर विद्युत टंचाईचा परिणाम | प्रा. डॉ. कच्छवे मारोती | 48 |
| 15. | ग्रामीण विकासात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची भुमिका | प्रा. वडकर एस. एस. | 53 |
| 16. | आधुनिक नाशिक (राजकीय, औद्योगिक, शैक्षणिक) | प्रा. चव्हाण व्ही. के. | 56 |
| 17. | नाशिक जिल्ह्यातील आदिवासींचे सामाजिक जीवन | प्रा. डॉ. साळुंके यशवंत | 61 |

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.III. Issue : IV,
Octomber, 2014

# नाशिक जिल्ह्यातील आदिवासींचे सामाजिक जीवन

प्रा. डॉ. साळुंके यशवंत मुरलीधर
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
ओझर ता. निफाड, जि. नाशिक (महाराष्ट्र)

आदिवासी समाजाचे समाजशास्त्रीय अध्ययन करतांना काही सारख्या लक्षणांच्या आधारे त्या समाजाचे वर्गिकरण करणे हा या अध्ययनाचा एक भाग आहे. आदिवासी जमातीचे समाजजीवन त्या जमातीचे राहाण्याचे ठिकाण, प्रदेश, वंश, भाषा, धर्म, संस्कृती इ. चा अभ्यास करून समाजजीवनाचे विविध घटकात वर्गीकरण करता येते. त्याच प्रमाणे या जमातींचे उदरनिर्वाहाचे साधने याचा अभ्यास करून या जमातीच्या समाजशास्त्राचा अभ्यास करता येतो. प्राचीन काळात भारतात काही आदिम जमातींने अनेक प्रदेशात राज्ये निर्माण केली त्यातून आपली संस्कृती विकसित केली तर काही आदिम जमातींनी शेवटच्या स्तरापासून कष्टाची कामे करून भारतीय समाज विकासात हातभार लावला असा आदिमांचा प्रवास मध्ययुगापर्यंत चालत आलेला दिसतो. आधुनिक काळात ब्रिटिश वर्चस्वातून आदिमांच्या समाज - संस्कृती जीवनात हस्तक्षेप होताच आपले परंपरीक समाजजीवन टीकवण्यासाठी संर्घष सुरू झाला. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी जमाती या पासून वेगळ्या नव्हत्या.

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजजीवनाचा अभ्यास करतांना कोकणा, वारली, ठाकर या आदिवासीं जमातींच्या समाज जीवनाचा अभ्यास केला आहे. नाशिक जिल्ह्यातील कोकणा, वारली ठाकर या जमातींच्या समाजजीवनाचा विचार करायचा असेल तर त्या समाजातील जन्मापासून ते मृत्युपर्यंतचा विधी, राहणीमान, वेशभूषा, विवाह, आचार - विचार, व्यसनाधिनता, अलंकार, आरोग्य, प्रथा इ. घटकांचा विचार करावा लागतो. आदिवासी भोळा त्याचबरोबर अंधश्रध्देकडे जाणारा आहे या घटकांचा विचार घेऊन सदर समाजाचे सामाजिक विश्लेषण करता येते. आज आदिम पूर्वीच्या सारखा अर्धनग्न फारसा दिसत नाही. आधुनिकीकरणाशी त्याचा संपर्क आल्याने बहुतांश आदिवासी समाजाची वेशभूषा व पेहरावात बदल होताना दिसतो. परंतू असे असले तरी डोंगर - दऱ्यात, कडी - कपारीत, निसर्गात स्वच्छंदी होऊन फिरणे असे मुक्तजीवन आजही आदिवासी भागातील जमातीचे जीवनाचा एक भाग दिसते.

**आदिवासींचे कुटूंब :** प्रा. राल्फ बिल्स व हॅरी हॉईजर यांच्या मते "आप्तसंबधाच्या बंधनांनी एकत्रित आलेल्या सभासदांचा सामाजिक समूह म्हणजे कुटूंब होय". अन्य समाजाप्रमाणे आदिवासी समाजात देखील कुटूंबाला अनन्यसाधारण असे महत्त्व असते. समाज विकासाच्या टप्प्यातील पहिली अवस्था कुटूंब होय. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजात शिकार अवस्थेपासून ते शेती व शेतमजुरी अवस्थेपर्यंत कुटूंब महत्त्वपूर्ण भूमिका बजावत होते व आहे असे म्हणता येते. कुटूंबाच्या निर्मितीमुळे समाजामधील सातत्य व स्थैर्य टिकून राहिले आहे. म्हणून नाशिक जिल्ह्यातील आदिवासींच्या समाजजीवनाचा अभ्यास कुटूंबापासून करणे योग्य वाटते.

आदिवासी जमातीतील कोकणा, वारली, ठाकर, जमातीत संपत्ती, वारसा, वंशानुक्रम या बाबतीत पुरूषप्रधान व्यवस्था प्रचलित आहे. मूल व अविवाहित मुली वडीलांचे कुळ नाम लावतात. कुटुंब विषयक सर्व अधिकार पित्याकडून पुत्राकडे जातात. कुटूंबात मुलाचे लग्न झाल्यानंतर काही काळानंतर त्या मुलाचा स्वतंत्र राहाण्याचा कल असल्यास गावातील पंचमंडळीकडून स्थावर मालमत्तेछो कुटुंबातील मुलांमध्ये समान वाटप होते. त्याचबरोबर शेती अवजारेपासून जनावरे, भांडे, लाकडे या वस्तुंची सारखी वाटणी होते.

नाशिक जिल्ह्यात कोकणा कुटुंबाप्रमाणे वारली कुटूंब स्त्रीचा अनादर करत नाही कारण तीच सर्व घर सांभाळते वारल्यांमध्ये बापा व्यक्तीरिक्त कुटुंबातील इतर व्यक्तींना स्वतंत्र मत नसते. मुलगा हा वारली कुटुंबाचा

International Monthly
Research Journal For All
Subject. Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.III. Issue : IV,
Octomber, 2014

महत्त्वाचा भाग समजला जातो. मूल जन्माला येणे ही आनंदाची गोष्ट असते तसेच जास्त मुले असावीत तीच कुटुंबाला मदत करतात. म्हणून मुलांना वारली, कोकणा, ठाकर समाजात संपत्ती मानतात याचा अर्थ मुलगा - मुलगी असा लिंगवाचक भेदभाव होत नाही. मुलीला ही योग्य वागणूक दिली जाते. ठाकर कुटूंबात शेवटचा मुलगा बापाचे मातृक्षणी पालनपोषण करण्यासाठी बापाजवळ राहतो. ठाकरांमध्ये काहीवेळा स्त्रीला मारझोड करून राग व्यक्त केला जातो. आदिवासी समाजात पुरूष वर्गाला शेती व इतर कामासाठी स्त्री मदत करते. त्याचबरोबर घरातील कामे ते लहान मुलांचे संगोपन या गोष्टी स्त्रीकडून कुटुंबातील महत्त्वाची जबाबदारी पार पाडते. आदिवासी जमातीत विशेषत: वारली मुलगा नसल्यास दत्तक घेण्याची प्रथा फारसी प्रचलित नसली तरी पहिल्या पत्नीला मुलगा नसल्यास दुसरे लग्न केले जाते पण तरीही मुली झाल्यास स्वत: च्या कुळातील मुलाला आपला मुलगा म्हणून वाढवले जाते. आदिवासी कुटुंबात एकमेकांविषयी आंतरिक जिव्हाळा माया, प्रेम खूप असते.

**आदिवासींचे पाडे व वस्त्या :** नाशिक जिल्ह्यातील आदिवासींच्या लहान वस्त्यांना पाडे किंवा पाडा असे म्हटले जाते. या पाड्यामध्ये १० ते ४० घरे असतात. असे १५ ते २० पाडे मिळून एकच ग्रामपंचायत तयार होते. प्रत्येक पाडा हा एकमेकांपासून एक ते दोन कि. मी. अंतरावर दिसून येतो बहूतांश पाडे डोंगरावर, दऱ्या खोऱ्यात दिसून येतात. त्याच प्रमाणे काही आदिवासी आपल्या शेती जवळच वस्त्या तयार करत असल्याने त्या वस्त्यांचे रूपांतर पाड्यात होतांना दिसते. आदिवासींच्या पाडे ही प्रामुख्याने एकाच जमातीची किंवा गटागटाने वस्ती केलेली दिसतात. उदा. वारली, कोकणा या जमातींचे स्वतंत्र पाडे सुरगाणा, पेठ, तालुक्यात दिसून येतात.

आदिवासी पाड्यांचे किंवा गावांचे नावे ही कुळ, चालिरीती, डोंगर, वनस्पती, प्राण्यांची नावे दिलेली दिसतात. उदा. अस्वलीपाडा, वडपाडा, फनसपाडा, पिंपळपाडा, देवीपाडा, निंबारपाडा, बोरीपाडा, जामुनपाडा, रानपाडा, कमळीचापाडा, हनमंत पाडा, कोल्हेरपाडा, शिंदेपाडा, खिल्लारपाडा, टेपणपाडा, गांडुळपाडा, देवलदरी, वाळुझिरा, अंलगुण, कोळ्ळुपाडा, खौकरतळे, भुवण, रणतोंडीपाडा इ. पाड्यांची नावे आणि गावांची नावे वैशिष्ट्य पूर्ण आहेत.

**आदिवासी घरांची रचना :** निसर्गाच्या सानिध्यात असणारी आदिवासी जमात विशेषत: डोंगराळ भागात, दऱ्याखोऱ्यात व जास्त पाऊस होणाऱ्या भागात असल्याने घरासाठी स्थानिक नैसर्गिक साधनांचा वापर करून निवाऱ्याची सोय करतात. बऱ्याच प्रमाणात घरे दिसायला चेटी परंतु टवटवीत दिसतात. जंगलात मुबलक प्रमाणात मिळणारे सागवान लाकूड, गवत, बांबू, काड्या इ. साहित्यांचा वापर होतो. घराची रचना चौमोळी दिसून येते त्यात गरिबांची घरे कारवीच्या कुडाची असून त्याभिंतीला शेण मातीने आतून बाहेरून लिंपतात, भिंतीला पळसाची पानेही लावली जातात तसेच परिस्थिती चांगली असलेल्या आदिवासींची घराची रचना पाहिल्यास घरासाठी सागवानी लाकडाचे नक्षीकाम केले खांब लावलेले दिसतात भिंती दगडा विटांच्या व घरावर कौले दिसून येतात त्यात समोर आंगण त्यानंतर वसरी (बैठक) शेजारी स्वयंपाक घर, धान्य कोठी (कणगी), मागच्या बाजुला गोठा दिसून येतो. शेतीप्रधान असणाऱ्या आदिवासीकडे शेतीची साधने घराबाहेर ठेवलेली दिसतात. घरात सामान मोजकेच परंतु त्यात प्रामुख्याने मासे पकडण्यासाठी जाळी, बांबुपासून बनवलेली भोवडी, असते आज मात्र काही आदिवासी भागात काही प्रमाणात घरांची रचनेला आधुनिकेतेची जोड दिसत आहे.

**आदिवासींची कुळे व नाते व्यवस्था :** वारली जमातींचे अभ्यासक के. जी. सावे यांच्या मते २०० पोटकुळे आहेत. तसेच परस्परांशी बेटी व्यवहार करणारे कुळे आहेत. तर कोकणा जमातीत कुलनाम हेच आडनाव असते. परंपरेनुसार ही जमात प्रमुख २४ कुळात विभागलेली होती. आतामात्र कुळ आणि उपकूळांची संख्या वाढलेली आहे.

नाशिक जिल्ह्यात वारली समाजातील आडनावे व कुळे पुढीलप्रमाणे दिसतात उदा. हाडस, वाघमारे, चौधरी, दिवा, डबके, पडेर, वड, वळवी, महाले, दोडके, फोजदार, कार्ले, फडवळ, धांगोडे, तलवारे, कोथी, कुंवर, सापडा,

International Monthly Research Journal For All Subject, Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.III. Issue : IV,
Octomber, 2014

तुंबडा, पवार, कोदे इ. तर कोकणा मध्ये आहिरे, आवारी, कंहाडोळ, गुंबाडे, गायकवाड, गावीत, गांगोडे, गवळी, गांगुर्डे, तुंगार, चौधरी, दाविल, टोपले, दळवी, डोळे, निकुले, भोंडवे, बहिरम, भानसे, भडांगे, सहारे, राऊत, सापळे, वाघेरा, हिंडे, हांडे, भवरा इ. कुळे व आडनावे कोकणी समाजात आहेत. कोकणी कुळांमध्ये भोये हे श्रेष्ठ कुळ मानले जाते. त्यांनतर महाले, गावीत, अशी दर्जानुसार कुळांची क्रमवारी दिसते. परंतु अलिकडे कुळांमध्ये श्रेष्ठ - कनिष्ठ असा भेदभाव राहिलेला नसून मुक्तपणे रोटी - बेटी व्यवहार होतांना कोकणा समाजात दिसतात. पवार, गायकवाड, बागुल, चव्हाण, जाधव ही मराठा, कुणबी, समाजातील अनेक प्रसिध्द आडनावे कोकणा समाजात आहेत पडवी, गांगोडा, पाडवी ही वारली कुळातील आडनावे कोकणा समाजात आहेत.

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजात विशेषत: कोकणा, वारली या जमातीत नावे व्यवस्था अतिशय सुदृढ आहे. त्यांच्या नात्यांमधील संबंध त्यांच्या रूढी परंपरेननुसारच असतात नाशिक जिल्ह्यातील आदिवासीसमाज (कोकणा, वारली, महादेव कोळी) हा समाज नियमानुसार व्यवहार, आदर, अधिकार, मानपान, पाळत असतो. उदा. इतर समाजात ज्याप्रमाणे सासू - जावई यांचे संबंध मोकळेपणाचे नसतात परंतु एकमेकांविषयी आदराचे असतात. आदिवासी समाज सामाजिक दृष्ट्या संघटीत असलेला दिसतो.

**आदिवासींचे स्वभाव :** दऱ्या खोऱ्यात, डोंगरकपारीत, दूर्गम भागात राहाणारा नाशिक जिल्ह्यातील आदिवासी शहरी व नागरीकरणापासून दूर वास्तव्य असल्याने बऱ्याच प्रमाणात अडाणी व अंधश्रध्दा बाळगणारा आहे. काळ्या सावळ्या रंगाचे, मध्यम उंचीचे, सशक्त बांध्याचे असे नाशिक जिल्ह्यातील आदिवासी कोकणा, वारली जमात आहे. स्वभावाने स्वच्छ, शांत, प्रिय, कष्टाळू, संकोचणारा, आबोलवृत्ती दिसून येते परंतु घरी आलेल्या पाहुण्यांचे आदरातिथ्य, जेवल्या शिवाय जावू देत नाहीत. सामाजिक सांधिकवृत्ती मोठ्या प्रमाणात दिसून येते उदा. एखाद्या व्यक्तीला सर्पदंश झाल्यास, आजारी पडल्यास सदर व्यक्तीस दुर्गम भागातून त्या व्यक्तीला झोळीत घालून दवाखान्यात नेतात. आदिवासी समाज आदरातिथ्य करण्यात उत्साही असतो. आलेल्या पाहुण्यांना जेवणा शिवाय त्यात मासे, कोंबडीचे जेवण केले जाते. किंवा परिस्थिती साधारण असल्यास चटणी (भुजा) भाकर दिली जाते. थोडक्यात आदिवासी समाज स्वत:हून दुसऱ्याशी न बोलणारा, उदारमतवादी, निसर्गात रमणारा, दैववादी, श्रध्दाळू असा विविध पैलूंचा स्वभाव असणारा आहे.

**आदिवासींचा पेहराव :** आजचा आदिवासी पेहरावात बराचसा आधुनिकतेचा प्रभाव दिसतो विशेषत: तरूण युवक - युवती यांनी आधुनिक पेहरावात युवक पॅन्ट, शर्ट तर युवती सलवार कमीज घालतांना दिसते परंतु वयस्कर व वयोवृध्द स्त्री पुरूष पारंपरिक पेहराव करतांना दिसून येतो त्यात पुरूषांच्या अंगात कोपरी, धोती, लंगोटी, डोक्याला मुंडासे असा पेहराव दिसतो. आदिवासी स्त्री पोषाख मात्र निराळाच दिसतो. नऊवारी लांबीच्या तुकड्याचे दोन समान भाग करून त्यापैकी एकच तुकडा ऐकाच वेळी नेसायचा याला भोत्या किंवा धांदूक असेही म्हणतात. अंगात पोलके व डोक्यावर फडकी नावाचे उपवस्त्रे घेतात पाच मीटर लांबीचे हे सुती कापड धुळे, मालेगाव, अमळनेर येथून येते.

**जन्मविधी :** आदिवासी समाज आपल्या जीवनाला निसर्गाशी जोडत असतो बाळाचा जन्म ही नैसर्गिक घटना असली तरी या घटनेचे सामाजिक व सांस्कृतिक वेगळेपण दिसून येते. बहुतांश आदिवासी स्त्रीचे बाळंतपण घरीच होते. परिस्थिती चांगली असल्यास तालुक्याच्या दवाखान्यात स्त्रीला बाळंतपणासाठी नेली जाते. घरी बाळंतपण सुईनच्या साहाय्याने केली जाते. बाळाच्या जन्मानंतर बाळाची नाळ सुईन विळ्याने, चाकूने किंवा ब्लेडने कापते. पूर्वी बाळाची नाळ पैशावर ठेवून कांडांने कापत असे हे कांड सायाळ या प्राण्याच्या अंगावरील तीक्ष्ण पीस असते. कापलेला नाळ बाळतीणीच्या खोलीत एका कोपऱ्यात खड्डा खोदून बुजविला जातो. स्त्रीला या काळात नागलीची भाकर, भगर इत्यादी हलके अन्न दिले जाते. बाळंतीण स्त्री व बाळाला आंघोळ घालण्याचे

International Monthly Research Journal For All Subject, Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.III. Issue : IV,
Octomber, 2014

काम सुईन किंवा पोटधरी करते पोटधरी ही सुईनला सहकार्य किंवा मदतनीस म्हणून काम करीत असते.

**पाचवी :** बाळाचा जन्माच्या पाचव्या दिवशी पाचवी किंवा पाचोरा कार्यक्रम केला जातो. सकाळी आठ ते नऊ वाजेपर्यंत हा कार्यक्रम केला जातो. परंतु त्या दिवशी शनिवार असेल तर हा कार्यक्रम केला जात नाही. नाळ पुरलेल्या ठिकाणी धान पुजा केली जाते. हळद, कुंकू , नागली, तुर, वरई, ज्वारी इ. पाच धान्य त्या खड्यात टाकून खड्डा बुजविला जातो. त्या ठिकाणी गोडतेलाचा दिवा लावून पारंपरिक पध्दतीने पूजा केली जाते. पूजा करण्याच्या वेळी मासे, खेकडे, दारू, ठेवली जाते कारण जन्म झालेले बाळ मासे, खेकडा शिकार करणेसाठी तरबेज होईल अशी आदिवासींची धारणा असते. या दिवशी पाहुणे आलेले असतात सदर विधीला सुईनचे मार्गदर्शन असते. सुईनला त्या बद्दल धान्य व २१ रूपयापर्यंत दक्षीणा दिली जाते.

**बारसे :** बारसे हा विधी बाळाला बारा दिवस झाल्यानंतर साजरा केला जातो. बाळाला नविन कपडे परिधान करून जमलेल्या स्त्रीया, सुईन बाळाला झोका देतात समाजातील पाच स्त्रींना बोलावून पाच चोळीचे खण दिले जातात त्याच बरोबर परिसरातील सर्व देवांची पूजा केली जाते. बाळाचे कान सोन्याच्या काडीने सोनाराकडून टोचल्या जाते.

**नामकरण विधी :** बाळाचे नाव हे पाचवी नंतर गावातील जाणाकार व्यक्तीकडून किंवा ब्राह्मणाकडून ठेवले जाते. तर काही ठिकाणी सव्वा महिना बाळाला पूर्ण झाल्यानंतर बाळाचे नाव ठेवल्या जाते जुन्या वयस्क लोकांची नावे वारावरून ठेवल्या गेल्याचे दिसते उदा. सोमवारी जन्म झाल्यास सोमनाथ, सोमीबाई, मंगळवारी जन्म झाल्यास मंगळू, मंगळी, गुरूवारी जन्म झाल्यास दत्तात्रय, पारू, शुक्रवारी जन्म झाल्यास सुकर, सुकरी असे नाव ठेवतात, तसेच बाळाचा रंग काळा असल्यास काळू व गोरा असल्यास धवळ्या ठेवल्या जाते. अलीकडे मात्र बाळाचे नाव इतर समाजाप्रमाणे ठेवले दिसते.

**जावळ काढणे :** आदिवासी समाजामध्ये मूल वर्षाचे किंवा तीन -चार महिने झाल्यानंतर काढले जातात मुलाचा मामा जावळ विधी वेळी येतो मामाला कुंकवाचा टिळा लावून २० ते २५ रूपयांचा खोशारा दिला जातो त्यानंतर मामा मुलांचे जावळ काढतो खोशारा म्हणजे मुलाचा मामा त्याला केस काढल्या बद्दल देणगी दिली जाते. काही भागात होळीच्या दुसऱ्या दिवशी मामाकडून जावळ काढल्या जाते.

**मृत्युविधी :** व्यक्तीच्या मृत्यु झाल्यानंतर त्याचा जवळचा नातेवाईक मृताला मांडी देतो. मृताला जाळण्याची व पुरण्याची दोन्ही प्रथा दिसून येतात. रात्री एखादी व्यक्ती मरण पावली तर सकाळपर्यंत जागरण केले जाते त्याला रातवा असे म्हणतात जागरण करण्यासाठी थाळा गाण्यावर गोष्टीच्या रूपात कथा सांगितल्या जाते त्यामुळे जमलेल्या लोकांचे जागरण होते. या प्रसंगी भात उखळात मुसळाने कांडतात ते तांदूळ पाखडून शिजवतात त्याला सांबोळ असे म्हणतात. मृत व्यक्तीला उखळावर नेऊन हळद लावली जाते. नवीन कपडे घालून सागाची लाकडे, बांबू, गवत, साहाय्याने अंबाडी ने बांधून तिरडी तयार करून मृत पुरूष असेल तर कापड धोतर, स्त्री असेल तर फडकी किंवा पातळ टाकतात. लहान मुल असेल तर शाल किंवा टॉवेल टाकतात. अंतयात्रेत स्त्री फक्त विसाव्यापर्यंत जातात विसाव्याला इसूना म्हणतात. नंतर विहीरीवर जावून आंघोळ केली जाते. मृत व्यक्तीच्या घरी गवरी, अगरबत्ती पेटवून ती हात डोक्यावर ठेवून पायापर्यंत उतारून टाकतात नंतर सर्व स्त्रीया आपल्या घरी जातात चितेवर मृत व्यक्तीला ठेवल्यावर तो व्यक्ती दारू पित असेल तर मृताच्या तोंडात दारूचे थेंब टाकतात त्यानंतर इतर समाजाप्रमाणे मृतास अग्नी दिला जातो.

त्यानंतर दहाव्या दिवशी दहावा विधी पार पाडला जातो त्या दिवशी दहावा विधी जुना जानकार व्यक्ती किंवा भगतकडून पार पाडला जातो विसाव्याच्या ठिकाणी भाताचा भुसा, बांबुची व एरंडाची गोमुदाने भरलेल्या नळ्या गोल भोपळा फोडतात त्याठिकाणी अंड्याची भाकर (शाकूची चाणकी) नागलीची भाकर ठेवतात त्या

International Monthly Research Journal For All Subject. Akshardeep

ISSN 2278-8204
Vol.III. Issue : IV,
Octomber, 2014

ठिकाणी दगडाखाली ठेवलेले पैसे काढून शेवटी विसाव्याला पाच फेऱ्या मारतात नंतर स्मशानभूमीत जावून मरण पावलेल्या माणसाची राख पाण्याने धुवून टाकतात घरातील पुरूष दाढी व मुंडण करतात. घरी येऊन घरातील प्रमुख व्यक्ती चुलीत भात, दाळ, तुपाची अंगारी टाकतो परिसरातील देवांची, देवाऱ्यातील देवांची पूजा करतो. दहाव्या निमित्त जमलेले समाजातील लोक जेवण करतात तसेच जवळचे नातेवाईक मृत व्यक्तीच्या घरातील पुरूषांना टोपी टॉवेल स्त्रीयांना पीस, फडकी, लुगडे देतात जो व्यक्ती हा विधी करतो त्याला भेट म्हणून पैसा किंवा वस्तू दिल्या जातात.

**जातपंचायतीचे स्थान :** आदिवासी पाड्यांवर व वस्तींवर कुटुंबातील भांडणे गावातील भाऊबंदकी, अनैतिक संबंध, काडीमोड, तरूण - तरूणी प्रेमसंबध, शेत जमीन वाद, दारू पिऊन केलेली भांडणे इ. वाद सोडवण्यासाठी गावपंचायत व त्या समाजाची जातपंचायत असते. या पंचायतीत गावचा पाटील, पंच मंडळी (पाच किंवा अधिक सदस्य) असतात. पंचायती मधील सदस्य हे वयाने मोठे, अनुभवी, सामाजिक व सांस्कृतिक चाली रितीची माहिती असणारे असतात. न्यायदानाच्या दिवशी गावातील जागल्या किंवा नाईक दवंडी देवून न्यायनिवाड्याची जागा सांगतो. न्याय निवाड्याची जागा एखाद्या मंदिरासमोर मोठ्या झाडाखाली असते. दोन्ही पक्षकारांच्या बाजू ऐकून पंचायत आपल्या सद्सद्विवेक बुध्दीने अन्याय ग्रस्ताला न्याय मिळवून देते गावपंचायत गुन्ह्याच्या स्वरूपानुसार दंड वसूलकरून गाव जेवण दिल्या जाते. परंतु अलिकडे ग्रामपंचायतीच्या सरपंचाचे व ग्रामपंचायत सदस्यांचे महत्त्व वाढत असून पारंपरिक पंचायत धोक्यात येऊ लागली आहे.

**नाईक :** आदिवासी समाजात नाईकाचे स्थान आजही महत्त्वपूर्ण आहे. पूर्वीच्या पाटलांना ज्या प्रमाणे इनामी जमिनी आहेत त्या प्रमाणे नाईकांना देखील इनामी जमिनी आहेत पूर्वी वंशपरंपरेने नाईक होत असे. परंतु अलिकडे ग्रामस्थ विश्वासू मानसाची नेमणूक करतो. नाईकाला विविध सन - उत्साहात धान्य दिले जाते त्याला इरा म्हणतात पाड्यावर व्यक्तींचा मृत्यु झाल्यावर नगारा वाजवितो. त्यामुळे पाड्यावरील लोकांना काहीतरी संदेश पोहचतो. लग्नविधी, साखरपुडा असेल तर त्यावेळी तांदूळ व आमंत्रण देण्याचे काम नाईक करतो. आमावस्या वेळी कुणी कामाला जावू नये. असा संदेश नगारा वाजवून देतो. नाईकाला लग्न संमारभांत मानाचे उपरणे दिले जाते आपल्या कामाच्या मोबदल्यात नाईक धान्य घेतो.

**विवाह पध्दती :** विवाह विधी संस्काराबाबत आदिवासींमध्ये पूर्ण आदर आहे. मुलांचे लग्नाचे वय १६ ते २० वर्ष तर मुलीचे लग्नाचे वय १४ ते १५ वर्ष या दरम्यान आहे विवाह प्रथा विविध प्रचलित आहे. मुलगा किंवा मुलगी दंड भरून नवा विवाह केव्हा करू शकतात स्त्रियांचे अनेक विवाह झाले तरी त्यांचे सामाजिक स्थान कमी होत नाही. एकाच कुळात विवाह होत नाही इतर समाज प्रमाणे मुलगा - मुलगी पहाण्याचा कार्यक्रम होतो मुलगी पसंत पडल्यावर मुलाकडचे नातेवाईक साखरपुड्याचे सामान घेऊन मुलीच्या घरी जातात मुलीला कुंकू लावून तिचे पाय धुतात, खोबरा वाटी, खारका, हळद, मुलीची खोळ भरतात या कार्यक्रमांच्या वेळी पान सुपारी दिल्या जाते. या साखरपुड्यानंतर लग्नाची तारीख निश्चित केल्या जाते. विवाह सोहळ्यात विविध विधी पार पाडल्या जातात. त्यात धान सुतणे, मांडव घालणे, मांडव सुतणे, तेल जाळणे, ढाका विधी, देवक घेऊन जाणे, तेलवन पाडणे इ. विधी पार पाडले जातात.

**साखरपुडा / पेन :** पेन या विवाह पध्दतीच्या छोट्या कार्यक्रमात मुलीच्या बापाकडे लग्नासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चाची ऐपत नसते त्यावेळी मुलीच्या बापाकडून ठरावीक रक्कम घेऊन साखर पुडा केला जातो. या कार्यक्रमात मुलाचे आप्तेष्ठ मुलीच्या घरी जातात मुलीचे घरचे आलेल्या पाहूण्यांचे स्वागत करतात. व्हराडी मंडळी हातपाय मांडवात बसतात पुरूषांना विडी ओढण्यास दिली जाते चहा पाणी दिले जाते. दोन्ही बाजुच्या प्रतिष्ठीतांसमोर मुलाने आणलेले कपडे, पैसे, वस्तू इत्यादी नवरी कपड्यांना दिले जातात नवरीला कुंकू

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.III. Issue : IV,
Octomber, 2014

लावल्यावर वाजंत्री वाजवली जाते या पेन पध्दतीचा कार्यक्रम झाल्यावर मुलीला नवऱ्याकडे पाठवले जाते. यानंतर काही वेळा पेन पध्दतीने विवाह झालेले जोडपे मुलाच्या लग्नासाठी परत विवाह करतांना दिसून येते. आज मात्र ही पध्दत फारशी दिसत नाही.

**आदिवासींची व्यसनाधिनता :** आदिवासींच्या जीवनाचा मद्याला (दारू) अतिशय महत्त्व आहे. मद्यचा संबंध कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक विधीशी जोडला असल्याने मद्याशिवाय कोणताच विधी पार पडत नाही. बाळाच्या जन्मापासून ते व्यक्तीच्या मृत्युपर्यंत मद्य प्राशन होत असते आदिवासी होळी, डोंगरदेव, खंडेराव, वाघदेव इ. प्रसंगी मद्य पितांना दिसतात या मद्य पिण्यात पुरूष स्त्रीया, वृध्द दिसून येतात.

डोंगर दऱ्यात, दुर्गम भागात राहणारा आदिवासी आपल्या परिसरात येणाऱ्या पिके, फळे, भाजीपाला, नागली, भात, कंदमुळे यावर आवलंबून असतो जरी तो काटक असला तरी सकस आहारापासून तो लांबच दिसतो काही वेळा अर्ध पोटी राहावे लागते त्याचा परिणाम भावी पिढीवर होतांना दिसतो आजही कुपोषणाने आदिवासी भागात शेकडो मुलांना ग्रासले आहे. निरक्षरता अंध:श्रध्दा, अज्ञान, रूढी, परंपरा, यांचा पगडा असल्याने डॉक्टरांपेक्षा भगताच्या अंगाऱ्या - धुपाऱ्यावर आदिवासींची गाढ श्रध्दा आहे त्यामुळे गंभीर आजाराला आदिवासी समाज बळी पडतो त्याचा आरोग्यावर गंभीर परिणाम होतो.

१) जोशी लक्ष्मण शास्त्री, संपादक, मराठी विश्वकोश खंड ८, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पृ. क्र. ८५.
२) गारे गोविंद, बदलाच्या उंबरठ्यावर कोकणा आदिवासी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, जुन २००० पृ. क्र.५.
३) पाटील मीना, वारली खंडेराव सावे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्विवतीयावृत्ती, २००७ पृ. क्र.२.
४) गारे गोविंद सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी, सहाध्ययन, मुंबई, १९७४ पृ. क्र.२८.
५) गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३० पृ. क्र१०६.